**सांगली जिल्हा परिषद,सांगली.**

**स्थायी समिती सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा कार्यवृत्तांत भाग-१**

**समिती सभागृह**

| दिनांक २१ जूलै २०१५ | सभेची वेळ दुपारी ०१.००वा. |
|---|---|

| अ.क्र. | उपस्थित पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीम.रेश्माक्का उर्फ रशमक्का मदगोंडा होर्ती उर्फ होर्तीकर | अध्यक्ष,तथा सभापती स्थायी समिती, व जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती जि.प.सांगली |
| २. | मा.श्री.लिंबाजी महिपती पाटील | उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व शिक्षण समिती. |
| ३. | मा. श्री.गजानन शिवलिंग कोठावळे | सभापती बांधकाम व आरोग्य समिती जि.प.सांगली |
| ४. | मा. सौ.मनिषा तानाजी पाटील | सभापती कृषि व पशुसंवर्धन समिती जि.प.सांगली |
| ५. | मा. सौ.उज्वला अशोक लांडगे | सभापती, समाजकल्याण समिती जि.प.सांगली |
| ६. | श्री.बसवराज सिदगोंडा पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| ७. | श्री.संजीवकुमार आबासाो सावंत | सदस्य स्थायी समिती. |
| ८. | श्री.फिरोज सिराज शेख | सदस्य स्थायी समिती. |
| ०९. | श्री.शांताराम (बापू) मोहनराव कदम | सदस्य स्थायी समिती. |
| १०. | श्री.हेमंत बालाजी पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| ११. | श्री.देवराज जनार्दन पाटील | सदस्य स्थायी समिती. |
| १२. | श्री.रणधीर शिवाजीराव नाईक | सदस्य स्थायी समिती. |

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा.श्री.सतिश लोखंडे | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २. | मा.श्री.दिलीप पाटील | अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३. | श्री.विक्रांत बगाडे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)तथा सचिव,स्थायी समिती. |
| ४. | सौ.शुभांगी पाटोळे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५. | श्री.रविकांत अडसूळ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) |
| ६. | श्री.किरण जाधव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) |
| ७. | श्री.आर.जे.भोसले | कृषि विकास अधिकारी |
| ८. | श्री.राम हंकारे | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ९. | श्री.संजय सा.माळी | कार्यकारी अभियंता (बांध) |
| १०. | श्री.एस.जी.सादिगले | कार्यकारी अभियंता (ग्रापापु) |
| ११. | श्री.लोभा हवेलीकर | कार्यकारी अभियंता (छोपावि) |
| १२. | सौ.निशादेवी वाघमोडे | शिक्षणाधिकारी (प्रा.) (नि) |
| १३. | श्री.विश्वासराव मोरे | जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी |
| १४. | श्री.लाडे जी.ओ. | उप अभियंता (भूजल) जिल्हा परिषद |
| १५. | श्री.जे.वाय.काळे | उपअभियंता, प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यं. (प्रतिनिधी) |
| १६. | श्री.उत्तमराव वाघमोडे | गट विकास अधिकारी पंचायत समिती मिरज |
| १७. | श्री.संतोष जोशी | गट विकास अधिकारी पंचायत समिती विटा |
| १८. | श्री.ओमराज गहाणे | गट विकास अधिकारी पंचायत समिती जत |
| १९. | श्री.रमेश जोशी | गट विकास अधिकारी पंचायत समिती पलूस |
| २०. | श्रीम.दिपाली पाटील | गट विकास अधिकारी पंचायत समिती शिराळा |
| २१. | श्री.संदिप पवार | गट विकास अधिकारी पं.स.क.महंकाळ |
| २२. | श्री.एस.व्ही.गाढवे | गट विकास अधिकारी पं.स. तासगांव |

| | | |
|---|---|---|
| २३. | श्री.गोरख शेलार | गट विकास अधिकारी पं.स. कडेगांव |
| २४. | श्री.विजयसिंह जाधव | गट विकास अधिकारी पं.स. वाळवा |
| २५. | श्रीम.एम.डी.साळुंखे | गट विकास अधिकारी आटपाडी |
| २६. | श्री.आर.आर.वेदांत | शाखा अभियंता ग्रापापु |
| २७. | श्री.पी.पी.मेलगे | शाखा अभियंता,(यां) |
| २८. | श्रीमती म्हैत्रे अ.शि. | प्रतिनिधी शिक्षणाधिकारी (मा.) |
| २९. | श्री.गणेश फड | कक्ष अधिकारी सामान्य प्रशासन विभाग जि.प.सांगली. |
| ३०. | श्री. फिरोज शेख | अधिक्षक सामान्य प्रशासन विभाग जि.प.सांगली. |
| ३१. | श्री.संतोष वीर | अधिक्षक जि.प.सांगली.मा.अध्यक्ष यांचे स्वीय सहा. |
| ३२. | श्री.एम.एम.कोरडे | अधिक्षक,समाजकल्याण विभाग जि.प.सांगली. |
| ३३. | सौ.शुभदा चिटणिस | लघुलेखक (निम्नश्रेणी), साप्रवि जि.प.सांगली. |
| ३४. | श्री.सुशांत पाटील | लघुलेखक (निम्नश्रेणी), शिक्षण विभाग जि.प.सांगली. |
| ३५. | श्री.पी.एच.जगताप | क.सहा. साप्रवि सभा शाखा जि.प.सांगली. |

## स्थायी समिती सभा संक्षिप्त कार्यवृतांत

जिल्हा परिषद, सांगली स्थायी समितीची सभा दिनांक २१/०७/२०१५ रोजी समिती सभागृह, जि.प.सांगली येथे संपन्न झाली. मा.श्रीमती रेश्माक्का होर्तीकर, सभापती स्थायी समिती तथा अध्यक्ष जिल्हा परिषद, सांगली यांनी सभेसाठी उपस्थित सर्व सन्मा.स्थायी समिती सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व खातेप्रमुख, गटविकास अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेस सूचित केले.

श्री.रणधीर नाईक सदस्य यांनी सभेच्या सुरुवातीस सभागृहात खालीलप्रमाणे दु:खवटयाचा ठराव मांडला, त्यास श्री. देवराज पाटील, सदस्य यांनी अनुमोदन दिले.

**दु:खवटयाचा ठराव**

जिल्हा परिषदेच्या माजी सभापती व सन्मा.सदस्या सौ.छायाताई खरमाटे यांच्या सासुबाई अनुसया खरमाटे यांचे दिनांक १४/०७/२०१५ रोजी वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे.

त्या बददल ही सभा शोक व्यक्त करीत आहे व त्यांच्या कुटूंबियाच्या दु:खात सहभागी होत आहे. ईश्वर दिवंगताचे आत्म्यास शांती व सद्गती देवो अशी प्रार्थना करुन सभागृहात दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली वहाणेत यावी.

त्यानंतर श्री.देवराज पाटील,सदस्य यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. त्यास श्री.बसवराज पाटील, सदस्य यांनी अनुमोदन दिले.

**अभिनंदनाचा ठराव**

जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा शिक्षण व अर्थ समिती सभापती मा.श्री. लिंबाजी पाटील, यांची यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमनपदी निवड झालेबद्यल अभिनंदनाचा ठराव घेणेत आला.

**.यावर सभागृहात टाळयांच्या गजरात या सर्वांचे हार्दिक अभिनंदन करुन शुभेच्छा देण्यात आल्या.**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) तथा सचिव स्थायी समिती यांनी** मागील सभा दि.२३/०६/२०१५ चा कार्यवृतांत वाचून कायम करणेबाबत विषय क्र. १ सादर केला असता, कार्यवृतांताचे अवलोकन होऊन कायम करणेत आला.

**विषय क्र.२:-** शासनाकडील महत्त्वाचे शासन निर्णय व परिपत्रकांचे वाचन करणे व

**विषय क्र.३:-** विषय समित्यांच्या मासिक सभांचे कार्यवृत्तांताचा व विभागाकडील कामकाजाचा आढावा घेणे

विषय क्र.२ व ३ सादर झालेनंतर,

**वित्त विभाग**

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** यांनीं विभागाकडील आढावा सादर केला. यामध्ये १३ वा वित्त आयोगाअंतर्गत एकूण शिल्लक निधी र.रु. ४७.५८ कोटी शिल्लक आहेत ते सप्टेंबर २०१५ अखेर खर्च करावयाचे आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषद स्तरावर रु. ९.१४ कोटी, पंचायत समिती स्तर- रु. ९.१२ कोटी व ग्रामपंचायत स्तरावर र.रु. २९.३१ कोटी शिल्लक आहेत. र.रु.१६७ कोटी प्राप्त झाले होते पैकी रु.१२० कोटी खर्च झालेला आहे व रु. ४७.५८ कोटी शिल्लक आहेत. ७१ % खर्च झालेला आहे. चौदावा वित्त आयोग अंतर्गत १०० टक्के निधी ग्रामपंचायतीला देणार आहेत. जिल्हा स्तरावर प्राप्त निधीसाठी बँकेत स्वतंत्र अकौंट उघडणेचे आहे. दि. १६ जुलै २०१५ चा शासन निर्णयाचे वाचन करणेत आले.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** १४ वा वित्त आयोगासंदर्भात माहिती सादर केलेली आहे. यामध्ये १००टक्के निधी ग्रामपंचायत स्तरावर देणेत येणार आहे.. सदरचा निधी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर पूर्वीच्याच पध्दतीने देणेत यावा असा ठराव करणेत यावा. अशा पध्दतीने कांहीच निधी जि.प.व पं.स.स्तरावर देणेत येणार नसेल तर जि.प व पं.स.सदस्य नाममात्र रहाण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकमताने ठराव करणेत यावा की, १३ व्या वित्त आयोगाचा निधी ज्याप्रमाणे जि.प., पं.स. व ग्रा.पं.स्तरावर देणेत येत होता त्याच पध्दतीने १४ व्या वित्त आयोगाची रक्कम खर्च झाली पाहिजे. जि.प.व पं.स.ला १ रुपया सुध्दा मिळणार नसेल तर जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना त्यांचे मतदारसंघात विकास कामे करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. याबाबत विधीमंडळाच्या अधिवेशनात चर्चा झाली पाहिजे. जि.प. व पं.स.स्तरावर कांहीही निधी नसेल तर ते बरोबर होणार नाही. ग्रामपंचायत स्तरावर ७० टक्के निधी देत गेलो परंतू त्याचा ग्रा.पं.स्तरावर भयानक दुरुपयोग केला असलेचे चित्र दिसून येते. कारण कांही ठिकाणी ग्रा.पं.स्तरावर सरपंच, सदस्य निरक्षर असलेने एम.बी.रेकॉर्ड, कामांचे अंदाजपत्रक अचूक केले जात नाही. योग्य प्रकारे निधी खर्च केला जात नाही. त्यामुळे १३ व्या वित्त आयोगाच्या पध्दतीनेच १४ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च केला पाहिजे असे

शासनास कळवावे. जि.प. व पं.स.स्तरासाठी निधी नसेल तर सदस्य त्यांचे मतदारसंघात काय काम करणार अशी भावना निर्माण होईल.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** दोन तालुक्यांचे भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीचे पैसे भरले गेले नव्हते. असे कां झाले याची माहिती घेतली कां?

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** संबंधीत दोन तालुक्यांची वर्गणी आलेली होती पण शेडयुल आलेले नव्हते. संबंधीत तालुक्याचे क्लार्कनी शेडयूल पाठवून दिलेले नव्हते.

**श्री.रणधीर नाईक,सदस्य:-** रक्कम मोठी आहे, संबंधीत क्लार्कनी खुलासा दिला कां?

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** संबंधीत गट शिक्षणाधिकारी यांचा खुलासा मागविणेबाबत शिक्षणाधिकारी यांना सांगितले होते. ग.वि.अ.स्तरावर पत्र दिलेले आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** संबंधीतावर कारवाई करणेत यावी. महानगरपालिका व नगरपालिका शिक्षण वर्गणी भरणेबाबत कांही चर्चा झाली कां?

**शिक्षणाधिकारी (प्राथ):-** इस्लामपूर नगरपालिकेने ५ लाख व आष्टा नगरपालिकेने रु.१० लाख भरलेले आहेत. म.न.पा.सांगली ने कांही भरलेले नाहीत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** आष्टा व इस्लामपूर नगरपालिकांनी रक्कम भरलेली आहे. उर्वरित रक्कमेसाठी त्यांनी हप्ते करुन मागितले आहेत. स्थायी समितीचा संदर्भ देऊन हप्ते ठरवून द्यावेत तसेच म.ना.पा.सांगली ला पुन्हा एकदा पत्र द्यावे.

**श्री.बसवराज पाटील,सदस्य :-** जिल्हा नियोजन समितीकडील प्राप्त निधी डी.पी.सी.सदस्यांनीच घेतलेला दिसून येत आहे.तरी उर्वरित सदस्याचा यामध्ये विचार केलेला नाही.

**श्री.फिरोज शेख, सदस्य:-** गेल्या दोन वर्षात नियतव्यय किती होता व यावर्षीचा नियतव्यय किती आहे हे पहावे.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** जिल्हा परिषद सदस्यांना डी.पी.सी.चे सदस्य म्हणून पाठविले ते जि.प.ला निधी जास्त मिळावा व सर्व सदस्यांना त्याचा उपयोग व्हावा. परंतू डीपीसी सदस्यांनी आपल्यापुरताच विचार केला आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा परिषदेला आणखी जास्त निधी मिळावा, जि.प.ला वेटेज मिळावे यासाठी जि.प.सदस्यांना जिल्हा नियोजन समितीमध्ये सदस्य म्हणून घेतलेले आहे. त्यानुसार मा.पालकमंत्र्यांनी सदस्यांशी चर्चा करुन जास्त कामे सुचविलेस सांगितले. व्हा इतर सदस्यांना विचारुन ५० लाखाची कामे सुचवायला पाहिजे होती.

**श्री.फिरोज शेख, सदस्य:-** मुळात डीपीसी कडील खातेनिहाय व योजनानिहाय नियतव्यय किती होता ते पहा. पदाधिकारीसुध्दा असेच करतात. सदस्यांचेसाठी दिलेला निधी व पदाधिकाऱ्यांचा निधी पाहिला तर असेच केलेले आहे.

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** जनसुविधा व नागरीसुविधा साठीच्या निधीची सुध्दा हिच परिस्थिती आहे.

**श्री.फिरोज शेख, सदस्य:-** रस्त्यांसाठी रु.३५ लाख व जनसुविधेसाठी रु.५ लाख दिलेले आहेत. स्वीय निधीतून बांधकाम विभागाकडील रु.७५ लाखांपैकी खानापूर तालुक्यासाठी किती दिले हे पहावे.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** स्वीय निधीचा प्रश्न नाही. डीपीसीमधून घ्यावयाच्या कामाबद्यल इतर सदस्यांना विचारले कां? हा प्रश्न आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** डीपीसीकडून रु.१२ कोटी जादा मिळाले, डीपीसी सदस्यांनी जादा कामे घेतली तर कांही नाही परंतू इतर सदस्यांना विचारुन कामे घ्यायला पाहिजे होती.

**कार्यकारी अभियंता(इवद) :-** डीपीसीमधून सदस्यांना रु.३५ लाख, डीपीसी व्यतिरिक्त सदस्यांना रु.१८ लाख, सभापतींना २४ लाख पर्यंतच्या कामांच्या याद्या तयार करुन मान्यतेसाठी सादर केलेल्या होत्या. त्यास मान्यता दिलेल्या आहेत.

**पशुसंवर्धन विभाग**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-** यांनी योजनानिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. सर्व योजनांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त कामे झालेली असलेचे सांगितले.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** औषध वाटप ऑनलाईन करणेचे मागील मिटींगमध्ये ठरले होते. त्याचे काय झाले?

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-** प्रत्येक दवाखान्यात संगणक उपलब्ध नसलेने औषधाची माहिती ऑनलाईन करणे शक्य झालेले नाही. शिवाय संगणक हाताळणेसाठी फार्मासिस्ट सगळीकडे नाहीत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** अजून किती संगणक लागतील?

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी :-** अजून १०० संगणक लागतील. तालुकास्तरावर संगणक उपलब्ध आहेत त्यामुळे तालुकास्तरावर माहिती एकत्रित करुन औषध मागणी केली तर चालू शकते.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** औषध वाटपाची सिस्टीम ॲडव्हान्स होईल यासाठी काय करता येईल?

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी:-** आपण डायरेक्ट तालुकास्तरावर औषधे पाठवू शकतो. पशुसंवर्धन विभागाकडे औषध भांडारसाठी स्वतंत्र स्टाफ नाही. विस्तार अधिकारी यांचेकडून मागणी घेवून आर.सी.नुसारऔषध खरेदी करणेत येते. आष्टा येथे कार्यालय अंतर्गत सोय केलेली आहे.

**ग्रामपंचायत विभाग**

**उपमुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रापं) :-** यांनी बाबनिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, घरपट्टी वसुलीस स्थगिती असलेने वसुली झालेली नाही. पाणीपट्टी वसुली सुरु आहे.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** घरपट्टी वसुलीस स्थगिती आहे. ज्या छोटया ग्रामपंचायती आहेत त्यांची वसुली नसलेने प्रश्न निर्माण झालेले आहेत. ग्रा.पं.कर्मचारी, पगार, इतर नियमित खर्च यामध्ये मोठी अडचण आलेली आहे. सरकारने ही ग्रामपचायतींची बाजू उच्च न्यायालयापुढे मांडून हा प्रश्न निकालात निघाला पाहिजे. या परिस्थितीत नियमित खर्च भागविणेसाठी ग्रामनिधीतून ग्रामपंचायतींना कर्ज देता येईल कां हे पाहिले पाहिजे. नाहीतर ग्रामपंचायतीना शासनाकडून निधी द्यावा लागेल. ग्रा.पं./ जि.प.ची ही बाजू मांडून याबाबत लवकरात लवकर निर्णय घेवून स्थगिती उठवली पाहिजे. हायकोर्टाचा स्टे असलेने घरपट्टी वसुली नाही. परंतू पाणी पट्टी वसुलीस स्थगिती नाही तरी चुकीच्या पध्दतीने लोकांना सांगितले जाते. याबाबतीत जिल्हा परिषदेने योग्य तो निर्णय घेतला पाहिजे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं):-** ग्रा.पं.कर्मचा-यांचे किमान वेतनासाठी पुढील ६ महिने पुरेल एवढा निधी विकास कामे न करता शिल्लक ठेवणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** सीईओ-कलेक्टर संयुक्त आढावा बैठकीमध्ये हा प्रश्न मा.आयुक्त यांचेपुढे उपस्थित केलेला होता त्यावेळी पाणी पट्टी वसुली केली पाहिजे असे सांगितले.

**उप मु.का.अ.(ग्रापं):-** सन २०१५-१६ साठी वार्षिक कृती आराखडयामध्ये २३३ गावे प्रस्तावित असून त्यामध्ये दारिद्रय रेषेखालील ७२५७ व दारिद्रय रेषेवरील ३३८०६ अशी एकूण ४१०६३ कुटूंबापैकी १९९१ कुटूंबाचे शौचालय बांधकाम

पूर्ण आहे. उर्वरित बांधकाम पूर्ण करुन घेणेसाठी जिल्हयामध्ये गृहभेट विशेष मोहिम तसेच ग्रामसभा बैठकांचे नियोजन करणेत आलेले आहे. बेसलाईन सर्व्हेनुसार एकूण ३८१८५६ इतकी कुटूंबे त्यापैकी २९५९३८ कुटूंबांना वैयक्तीक शौचालय सुविधा उपलब्ध आहेत. तसेच १४०७२ कुटूंबे सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात. तसेच स्वच्छ भारत अभियान कार्यक्रम राबविणेसाठी सन २०१५-१६ मध्ये आरंभी शिल्लक एकूण र.रु.२४६.४७ लाख मधून मे २०१५अखेर १९.३५ लाख खर्च झालेला आहे. साडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी सन २०१४-१५ मध्ये तालुक्यातून ३ प्रमाणे ३० ग्रामपंचायतीची शासन निकषानुसार निवड करणेत आलेली आहे. व त्यानुसार प्राप्त अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देणेची कार्यवाही सुरु आहे. सन २०१५-१६ साठी प्रत्येक तालुक्यातून १० प्रमाणे गाव निवड प्रक्रिया सुरु आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी** :- डीजीटल इंडिया बाबत च्या शासन निर्णयाची प्रत सर्व सदस्यांना देणेत यावी.

**उप मु.का.अ.(ग्रापं):-** सेवा अधिनियमामध्ये ज्या पध्दतीने ग्राम विकास विभागानी त्यांचे धोरण जाहिर केलेले आहे त्याप्रमाणे प्रत्येक विभागानी आपल्या सेवांबाबत नियम जाहीर करावयाचे आहेत. यासाठी तीन महिन्याची मुदत आहे. इंआयोच्या घरकुला बरोबर मगांनरेगा अंतर्गत ९० दिवस काम देणेत येणार आहे. शिवाय शौचालयासाठी रु.१२००० अनुदान देणेत येणारआहे.

**श्री. संजीवकुमार सावंतः-** यशवंत घरकुल व वसंत घरकुलासाठी असे करता येईल कां?

**उप मु.का.अ.(ग्रापं):-** मगांनरेगा ही केंद्र पुरस्कृत योजना असलेने त्यांनी दिलेल्या यादीतीलच कामे घेता येतील.

**श्री.बसवराज पाटील, सदस्यः-** या सर्व गोष्टी ग्रामपंचायत स्तरावर होत नाहीत. याबाबत सर्व ग्रामपंचायींना सूचना देणेत याव्यात.

**श्री.संजीवकुमार सावंत, सदस्यः-** वसंत घरकुल मंजूरीचा आदेश दिला जातो तेंव्हाच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालय मंजूरीचा आदेश देणेत यावा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी** :- इं.आ.यो. घरकुलांना लोगो लावून घेणेची कार्यवाही ग.वि.अ.यांनी पूर्ण करुन घ्यावी. किती कुटुंबांकडे शौचालय नाही असा विषय आता येणार नसून, गांवातील किती लोक शौचास बाहेर जातात व किती लोक जात नाहीत याची माहिती घ्यावयाची आहे. कारण शौचालय असूनही कांही लोक त्याचा वापर करीत नाहीत असे आढळून आले आहे.

**श्री.फिरोज शेख, सदस्यः-** विटा येथील नगर भूमापन क्र.१९१ मधील अतिक्रमणाबाबत प्रत्यक्षात भेट देऊन माहिती घेणार होता त्याचे काय झाले? जि.प.सभेतील हा विषय होता, दोन महिने झाले तरी याची कार्यवाही झालेली नाही.

**उप मु.का.अ.(ग्रापं)** :- विटा येथील सदरची जागा शिक्षण विभागाची असलेने याबाबत शिक्षण विभागाने कार्यवाही करावयाची आहे.

**श्री.फिरोज शेख, सदस्यः-** नगरपालिकेने अतिक्रमण केलेले आहे. याकडे जिल्हापरिषदेने लक्ष द्यायला पाहिजे. जो विषय मिडीयापर्यंत जायला पाहिजे होता तो गेला नाही. जि.प.उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणेऐवजी उत्पन्नात घट होईल असे प्रयत्न जि.प.करीत आहे असे म्हणावे लागेल.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती** :- विटा येथील गाळे भाडे वसुली संदर्भात विषय झाला त्यात काय चूकीचे झाले?

**श्री.फिरोज शेख, सदस्यः-** विटा येथील न.भू.मा.क्र.१९१ मधील अतिक्रमण काढणेचे दृष्टीने आपण सर्व पदाधिकारी तिथे येणार होतात परंतू अजूनही आलेला नाहीत.

**शिक्षणाधिकारी (प्राथ) :-** त्या जागे संदर्भात नगरपालिकेने मासिक सभेत ठराव घेतलेला आहे की, सदरची जागा नगरपालिकेच्या शाळेसाठी मिळावी.

**ग.वि.अ.विटा :-** जि.प.मालकीच्या जागेतील ८०० स्क्वे.फूट जागा नगरपालिकेस जि.प.चा ठराव घेवून दिलेली होती परंतू तेवढीच जागा न घेता नगरपालिकेने सर्वच जागा ताब्यात घेतलेली आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथ):-** ग.वि.अ. विटा व ग.शि.अ.विटा यांना या जागेच्या अतिक्रमणाबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत सांगितले होते.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** बांधकाम विभाग, ग्रामपंचायत व शिक्षण विभाग अशा प्रत्येक विभागाच्या जागा आहेत.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** राज्य शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या सर्व मालमत्तेवर ग्रामपंचायत विभागाचे नियंत्रण ठेवणेचे आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** जिल्हा परिषदेची जागा असेल तर ती ताब्यात घेणेत यावी.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-**जिल्हयामध्ये सगळीकडे अशा जागा आहेत. सगळया खात्यांना बोलवले पाहिजे.

**श्री.फिरोज शेख, सदस्य:-** विटा येथील ही जागा २००० स्क्वे.फूट आहे त्यापैकी ८०० स्क्वे.फूट जागा नगरपालिकेस शैक्षणिक कामासाठी १९७९ साली दिलेली आहे. त्यातील कांही जागा रस्त्यासाठी घेवून अतिक्रमण केलेले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** या जागे संदर्भात शिक्षण विभागाने सद्यस्थितीबाबत टिपणी सादर करावी.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-**कवठेमहंकाळ येथे समाजकल्याण वसतिगृहाची जि.प.ची जागा आहे परंतू त्या समोरील मोकळी जागा जि.प.च्या नावांवर नाही. त्यामुळे अशा जागा जि.प.च्या नांवावर करुन घेणेसाठी संबंधीत सर्वच विभागानी जबाबदारी घेतलेली पाहिजे.

**ग.वि.अ.पं.स.विटा :-** विटा येथील न.भू.पा.१९१ मधील अतिक्रमण संदर्भात नगरपालिकेस नोटीस देणेत आलेली आहे.

**उप मु.का.अ.(ग्रापं) :-** ज्या खात्याच्या जागा आहेत त्या खातेप्रमुखांनी अतिक्रमण काढणेसंदर्भात सर्व कार्यवाही केली पाहिजे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** प्रत्येक विभागानी त्यांचे मालकीच्या किती जागा आहेत, त्यातील किती जागांवर अतिक्रमण आहे याची माहिती एक महिन्यात घ्यावी व पुढील स्थायी समितीमध्ये सादर करावी.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** जि.प.मालकीच्या कांही जागांवर महाराष्ट्र शासन, कांही जागा लोकल बोर्डच्या नांवे आहेत त्या ठिकाणी जि.प.चे नांव लावून घेतले पाहिजे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं):-** कांही ठिकाणी ग्रा.पं.च्या जागा सार्वजनिक संस्था, सामाजिक संस्थांनी मागणी केली तर त्या द्यावयाच्या कि नाही याचे धोरण ठरविले पाहिजे.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** ओम शांती या सामाजिक संस्थेसाठी जागा दिलेली आहे त्या पध्दतीने खुली जागा द्यायची कां हे ठरविले पाहिजे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** अशा जागा कायमस्वरुपी न देता ११ महिन्याच्या भाडेपट्टयावर देण्यास हरकत नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** जे ओपन प्लॉट आहेत ते ३० वर्षासाठी देणेबाबत मागणी होत आहे.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** अशी मागणी अमान्य करावी.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:-** मगांनरेगा अंतर्गत विहीर मंजूरीच्या कामांच्या चौकशीचे काम कुठपर्यंत आलेले आहे?

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी** :-पलूस व कडेगांव तालुक्यातील विहीरींच्या चौकशीचे काम अंतीम टप्प्यात आलेले आहे. विहीरींसाठी दिलेल्या विद्युत कनेक्शन बाबतची माहिती वीज वितरण कंपनीकडून मागविणेत आलेली आहे ती चार दिवसात प्राप्त होईल. २० ते २५ विहीरींचे रेकॉर्ड मिळत नव्हते ते मिळालेले आहे. लवकरच चौकशीचे काम पूर्ण होईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी** :- मा.मुख्यमंत्री महोदय यांचा प्रोग्रॅम आहे की, ३० जून १४ पूर्वी मंजूर केलेल्या व ३० जून २०१४ नंतर मंजूर केलेल्या सर्व विहीरी जुलै २०१५ अखेर पूर्ण करुन घ्यावयाच्या आहेत. या संदर्भात लाभार्थीनिहाय आढावा घेणेत आलेला आहे. संबंधीत लाभार्थ्यांचे विहीरचे कामासोबत फोटो घेवून अपलोड करणेबाबत संबंधीतांना सूचना दिलेल्या आहेत. कांही ठिकाणी विहीरीचे काम पूर्ण झालेले आहे परंतू एम.बी.रेकॉर्ड पूर्ण नाही त्यामुळे कामे अपूर्ण दिसत आहेत.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:**- विहीर मंजूर करतांना पूर्वीच्या विहीरी होत्या त्याच दाखविणेत आलेल्या आहेत असे झाले आहे कां?

**मुख्य कार्यकारी अधिकारी** :- यासाठीच लाभार्थीनिहाय विहीरीसह लाभार्थ्यांचे फोटो अपलोड करायला सांगितले आहे. दोन महिन्यात सर्व अहवाल प्राप्त होईल.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य** :- ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड डिजीटल करण्याच्या संदर्भात मागील सभेमध्ये चर्चा झालेली होती व डीपीसी ला प्रस्ताव द्यावयाचा होता त्याचे काय झाले?

**मुख्य कार्यकारी अधिकारी:**- मुख्यालतील रेकॉर्ड सॉर्टिंगचे काम सुरु करणेत आलेले आहे. सॉर्टिंगचे काम झाले की, महत्त्वाच्या रेकॉर्डचे स्कॅनिंगचे काम सुरु करणार आहोत.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)** :- आमच्या विभागाचे सॉर्टिंग झालेले आहे. जि.प.सभेचे प्रोसिडींग, सभेची नोटीस वगैरे जि.प.च्या वेबसाईटवर टाकणार आहोत. नाविन्यपूर्ण मधून या बाबी घेणार आहोत.

**श्री.फिरोज शेख, सदस्य:**- डीपीडीसीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून प्रत्येक तालुक्याला ५ घंटागाडया देण्याचा प्रस्ताव द्यायचे ठरले होते याबाबत डीपीसी कडून काय आले कां?

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं):**- येणा-या डीपीसी पुढे प्रस्ताव ठेवणेबाबत सांगितलेले आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:**- यशवंत घरकुलासाठी काय निकष ठरविणेत आलेले आहेत?

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं):**- यशवंत घरकुलासाठी निकष ठरविणेचे काम चालू आहे.

**श्री.रणधीर नाईक, सदस्य:**- अतिशय काळजीपूर्वक निकष ठरवून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. गरजू लोकांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. आर.सी.सी. बांधकाम चालेल कां याचाही उल्लेख नियमामध्ये केला पाहिजे.

**मा.श्रीमती रेशमाक्का होर्तीकर, अध्यक्षा:**- सदस्यांनी गरजू लोकांचीच शिफारस घरकुलासाठी करावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:**- यशवंत घरकुलाची यादी मंजूर करणेपूर्वी सर्व सदस्यांना दाखवावी. जी व्यक्ती दा.रे.च्या यादीच्या काठावर आहे त्यास घरकूल मिळाले पाहिजे. इंदिरा आवास योजनेचेच निकष यशवंत घरकुलाला लावणेत यावा.

**श्री.संजीवकुमार सावंत, सदस्य:**- सर्व गट विकास अधिकारी यांनी यशवंत घरकुल योजनेबाबत सर्व ग्रामपंचायतींना कळवावे.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती** :- यशवंत घरकुलसाठी र.रु.७५०००/- अनुदान देणार आहोत. संबंधीत लाभार्थ्यांनी कर्ज काढून चांगले घर बांधले तर काय हरकत आहे?

**श्री.देवराज पाटील, सदस्य:-** ज्यांची नांवे दारिद्रय रेषेच्या यादीत येत नाहीत व ते काठावर आहेत अशानाच घरकूल मंजूर करावे.

<u>महिला व बालकल्याण विभाग</u>

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)** यांनी बाबनिहाय सद्यस्थितीचा आढावा दिला. यामध्ये मुख्यत्वे, सॅम- मॅम बालकांची संख्या, रिक्त पदे, शिलाई मशीन-सायकल खरेदी, आयएसओ अंगणवाडया व प्रशिक्षण संदर्भात माहिती दिली. चालू वर्षी अंगणवाडी इमारती १२९ मंजूर असून आतापर्यंत फक्त ८६ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सर्व सन्मा.सदस्यांना मंजूर अंगणवाडी इमारतीची यादी दिलेली आहे. उर्वरित प्रस्ताव लवकरात लवकर यावेत अशी विनंती आहे.

**श्री.संजीवकुमार सावंत, सदस्य:-** अंगणवाडी इमारतीसाठी ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होत नाही अशा ठिकाणी काय करणार आहात?

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक):-** जिल्हयामध्ये ३४० ठिकाणी अंगणवाडी इमारतीसाठी जागा उपलब्ध नाही. गायरानची जागा उपलब्ध होऊ शकते परंतू एवढया लांब मुले येऊ शकणार नाहीत. सर्व अंगणवाडया इमारती पूर्ण झाल्याशिवाय पुढील अंगणवाडया इमारती मंजूर करणेत येणार नाही असे शासनाचे धोरण आहे.

**श्री.संजीवकुमार सावंत, सदस्य:-** जागा खरेदीसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक):-** ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारती नाहीत अशा अंगणवाडया कांही ठिकाणी प्राथ. शाळा खोल्यांमध्ये, कांही ठिकाणी भाडयाच्या जागेमध्ये भरविण्यात येतात.

**श्री.संजीवकुमार सावंत, सदस्य:-** अन्न व औषध प्रशासन खात्याने अंगणवाडी मुलांचे अन्न तयार करतात त्या ठिकाणी छापा टाकून तपासणी केली होती त्याचे पुढे काय झाले? आहाराची सध्याची सिस्टीम काय आहे?

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक):-** अंगणवाडी मुलांच्या आहार वाटपाचे काम अंगणवाडी सेविका व बचतगटाच्या मार्फत चालू आहे. प्रत्येक मुलासाठी रु.४.९२ पैसे मिळतात. त्याप्रमाणे बचतगटांशी करार करणेत येतो. कुपवाड येथील छाप्यामध्ये संबंधीतांकडे फूड लायसन नसलेचे आढळून आले आहे. ऑगष्ट अखेर करार केलेला आहे त्यानंतर ई टेंडर करुनच आहार पुरवठा आदेश देणेत येईल.

**श्री.रणधीर नाईक,सदस्य:-** आहार पुरवठयाचा आदेश देताना फूड लायसन पाहूनच द्यावे.

**श्री.संजीवकुमार सावंत, सदस्य:-** सायकल खरेदीचे काय केले आहे?

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** सायकल खरेदीसाठी शासनाकडील जी आर.सी.आहे, तो सायकल ब्रँड ओळखीचा नाही त्यामुळे ई टेंडर काढून खरेदी करणार आहोत.

**श्री.संजीवकुमार सावंत,सदस्य:-** मागील वर्षी देणेत आलेल्या सायकली विशाल कंपनीच्या आहेत. आयएसआय मार्क सायकलीवर नाही, स्टीकर चिकटवलेले होते. चांगल्या दर्जाच्या सायकली घ्यायच्या असल्या तर ई टेंडर करुन घ्यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** आर.सी.असेल तर ई टेंडरनी खरेदी केली तर ती अनियमितता होईल असे नियमात स्पष्ट म्हंटलेले आहे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक):-** सायकलच्या आर.सी.ची मुदत ३० जून १५ पर्यंत होती ती आता संपलेली आहे. ई- टेंडरची नस्ती मान्यतेसाठी सादर केलेली आहे.

**श्री.फिरोज शेख, सदस्य:-** रु. २०६ कोटीच्या चिक्की घोटाळयामधील चिक्की आपल्याकडे मिळालेली आहे कां?

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी(मबाक):-** शासनाकडून खरेदी केलेली शेंगदाणा चिक्की व राजगिरा चिक्की तालुकास्तरावर प्राप्त झालेली आहे. त्यातील शेंगदाणा चिक्की बद्यल कांही तक्रारी नाहीत. राजगिरा चिक्कीबद्यल तक्रारी होत्या त्याचा सप्लाय बंद केलेला आहे. तपासणीसाठी लॅबला पाठविणेत आलेले आहे.

**श्री. बसवराज पाटील, सदस्य:-** सांगली जिल्हयातील प्रत्येक गावातील घरांना नंबर देणे याबाबत प्रत्येक घरावर नंबर प्लेट असावी त्यावर आधारकार्ड/शिधापत्रिका नंबर, नांव,गांव इत्यादीचा समावेश असावा. याबाबतची कार्यवाही ग्रामपंचायत विभागाने करणेची आहे.

**आरोग्य विभाग**

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** यांनी बाबनिहाय आढावा सादर केला. यामध्ये मुख्यत्वे, दुषित पाणी नमुने तपासणी मध्ये दुषित पाणी असलेची टक्केवारी ११.३३ आहे. जिल्हयामध्ये सध्या कोणतीही मोठी साथ नसलेचे सांगितले. सर्व इंडिकेटरनिहाय सद्यस्थितीची महिती देवून मागील महिनाअखेर २५ टक्के काम अपेक्षित होते ते २७ टक्के काम झाले असलेचे सांगितले

**श्री.संजीवकुमार सावंत, सदस्य:-** प्रा.आ.केंद्रांना विंडसोलर बसविले होते. त्यातील खराब झालेले विंडसोल दुरुस्त करणेत आले कां?

**जिल्हा आरोग्य अधिकारी:-** सदरचे विंडसोलर कृषि विभागानी बसविलेले आहेत.

**कृषि विकास अधिकारी :-** दुरुस्तीसाठी कार्यवाही चालू केलेली आहे. संबंधीत पुरवठादारास दुरुस्तीबाबत अनेकवेळा कळवूनही त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही. यास्तव संबंधीत पुरवठादाराच्या डिपॉझीट रक्कमेतून दुरुस्त करुन घेणार आहोत.

**श्री.संजीवकुमार सावंत, सदस्य:-** संबंधीत पुरवठादारास ब्लॅकलिस्ट मध्ये टाकणेत यावे.

**कृषि विकास अधिकारी :-** संबंधीत पुरवठादारास ब्लॅकलिस्ट मध्ये टाकणेबाबत मिडास कळविणेत आले आहे.

**श्री.गजानन कोठावळे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती :-** नवीन विंड सोलर घेणेबाबत काय कार्यवाही केली?

**कृषि विकास अधिकारी :-** चालू वर्षी ११ विंड सोलर मंजूर आहेत. आर.सी.नसलेने ई टेंडर करणेची कार्यवाही चालू आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** संबंधीत पुरवठादार विंड सोलर दुरुस्तीसाठी दाद देत नसेल तर त्याचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करता येतो कां ते पहावे. लवकरात लवकर दुरुस्त करुन घेणेची कार्यवाही करावी. या पुरवठादारास राज्यात कोठेही काम देणेत येऊ नये असे मिडास कळवावे. तसेच सदरची बाब वेबसाईटवर प्रसिध्द करणेत यावी.

**श्री.बसवराव पाटील, सदस्य:-** ई टेंडर मध्ये सुध्दा वाटाघाटी करुन ब्लॅकमेल करण्याचे प्रकार सुरु आहेत. खरेदीचेवेळी अटी व शर्ती घालून त्यांचेकडून बॉंडवर लिहून घ्यायला पाहिजे. संबंधीत पुरवठादाराने १०० रु.च्या बॉंडवर प्रतिज्ञापत्र दिले पाहिजे. संबंधीतावर कायदेशीर कारवाई करावी.

**जिल्हा आरोग्य अधिकारी :-** AMC सुध्दा त्यांनीच घेतली पाहिजे अशी अट घातली पाहिजे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** विंड सोलर दुरुस्तीची कार्यवाही एक आठवडयात करुन घेणेत यावी.

**कृषी विभाग**

**कृषी विकास अधिकारी :-** यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन बायोगॅसचा लक्षांक १३५० असून १३०० जनरल व ५० अनु.जाती व जमातीसाठी असल्याचे सांगितले. यानंतर तालुकानिहाय

लक्षांकाचे वाटप केलेबाबतची माहिती वाचन करणेत आली. तसेच स्वीय निधीमधील चाफकटर ४० लाख, ताडपदरी १५ लाख यांचे आदेश दिले असल्यांचे सांगितले.

**श्री.संजीवकुमार सावंत,सदस्य :-** स्वीय निधीमधील खरेदी केलेल्या चाफकटर पेक्षा बाहेर मार्केटमध्ये ८ ते ९ हजार रुपयांना चांगल्या प्रतीचे चाफकटर मिळतात. आपण खरेदी केलेले चाफकटर चांगल्या पध्दतीने काम करत नसल्याने तक्रारी मोठया प्रमाणात आहेत.

**सौ.मनिषा पाटील,सभापती कृषी व पशुसंवर्धन समिती:-** याबाबत तक्रारी असल्यास लेखी देणेत याव्यात.

**श्री.संजीवकुमार सावंत,सदस्य :-** खरेदी केलेले साहित्य वालचंद महाविद्यालय यांचेकडून तपासणी करुन घेणेत यावे.

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी :-** एम.आय.डी.सी ने खात्री केले असलेबाबत आर.सी.मध्ये नमूद केलेले आहे.

**श्री.संजीवकुमार सावंत,सदस्य :-** सर्व साहित्यांची तपासणी करणेची आवश्यकता नाही तरी रँडमली सहित्य तपासणी करणेत यावी.

**कृषि विकास अधिकारी:-** वालचंद कॉलेजकडून तपासणी केल्याशिवाय पेमेंट करणार नाही. विशेष घटक योजनेसाठी सन २०१५-१६ साठी रु.४ कोटी ५० लाख नियतव्यय मंजूर आहे. विघयो चे ११५० लाभार्थी निवडावयाचे आहेत. तालुकानिहाय उद्दिष्ट निश्चित करुन कळविणेत आलेले आहे. ३८ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. सर्वांनी लक्ष घालून प्रस्ताव द्यावेत.

**श्री.संजीवकुमार सावंत,सदस्य:-** लाभार्थी निवडीसाठी तालुकानिहाय कँप घेणेत यावा.

**श्री.फिरोज शेख, सदस्य:-** लोकसहभागातून प्रदर्शन असेल तर टिंपणी मंजूरीचे कारणच काय?

**कृषि विकास अधिकारी:-** आटपाडी येथील कृषि प्रदर्शन जिल्हा परिषद सभेने मान्यता दिल्याशिवाय घेता येणार नाही. याबाबत कृषि समिती सभेमध्ये चर्चा झालेनुसार सदरचे प्रदर्शन संपूर्णतः लोकसहभागातून करावयाचे निश्चित केलेले आहे. यास स्थायी समिती सभेने शिफारस करणेबाबत विषय ठेवणेत आलेला असून लोकसहभागातून प्रदर्शन घेणेस जि.प.कडे शिफारस करणेत यावी.

**श्री.बसवराज पाटील, सदस्य:-** लोकसहभागातून कृषि प्रदर्शन भरवावे. जिल्हा परिषद यंत्रणा सहभागी होतील.

**श्री.देवराज पाटील,सदस्य:-** प्रदर्शनाची बातमी पेपरला देतेवेळी तांत्रिक अडचणींचा विचार करुन द्यायला पाहिजे होती. तांत्रिक अडचणीमुळे जि.प.कडून तरतूद होऊ शकत नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी:-** खातेप्रमुख मिटींगचे वेळी प्रदर्शन घेणा-या एजन्सीचे लोक आलेले होते. त्यावेळी त्यांना डिटेल सादरीकरण करणेस सांगितले होते. तसेच प्रदर्शन कसे भरवणार आहात, खर्च किती येणार आहे, त्यामध्ये संबंधीत संस्थेचा रोल काय असणार आहे, जि.प.चा रोल काय असणार आहे याबाबत सविस्तर बाबींचे सादरीकरण करणेस सांगितले. त्यानंतर त्यांनी जे सादरीकरण केले त्यामध्ये त्यांनी सांगितले की, संपूर्ण प्रदर्शनाचा खर्च ३० ते ३२ लाख असणार आहे.त्यामध्यें जि.प.ने रु.५ लाखाचा निधी द्यावा. त्यामध्ये ३०० ते ४०० स्टॉल्स असणार आहेत ते भाडे घेवून देणार आहोत. त्यामुळे शासकीय यंत्रणेचे नांव देवून व्यापारीकरण करणे ही बाब मान्य नव्हती. शिवाय तरतूद मंजूरीचा प्रश्न होता. कायद्यानुसार तांत्रिक अडचणीमुळे जि.प.च्या संयुक्त विद्यमाने प्रदर्शन घेवू शकत नाही.

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-** कृषि प्रदर्शनास तरतूद मंजूरीबाबत मला विचारणेत आले होते. परंतू जि.प.अंदाजपत्रकात कृषि प्रदर्शन असे लेखाशिर्षक आहे त्यासाठी १००० रु. टोकन प्रोव्हिजन करणेत आलेली आहे. मा.आर.आर.आबा यांचे स्मृतीप्रित्यर्थ कृषि व पशुपक्षी प्रदर्शन असे लेखाशिर्षक नसलेने चालू वर्षात जि.प.स्वीय निधीतून तरतूद करता येत नव्हती. पुढील वर्षी नवीन हेड ओपन करुन आपण तरतूद करु शकतो.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** याबाबत सर्वांचेबरोबर चर्चा होऊन सदरचे कृषि प्रदर्शन पूर्णपणे लोकसहभागातून भरविणेत येणार आहे. आर्थिक बाबीची जबाबदारी जि.प.ची असणार नाही. जिल्हा परिषद कोणताही निधी देणार नाही. प्रदर्शन घेणेस मान्यता देणेबाबत जि.प.सर्वसाधारण सभेस स्थायी समिती सभेकडून शिफारस करणेचा ठराव घेणेत यावा. प्रदर्शनातील सर्व स्टॉल्स विनामूल्य ठेवणेत यावेत. कोणतेही व्यापारीकरण करणेत येणार नाही. तसेच प्रदर्शनाच्या निमंत्रण पत्रिकेमध्ये जि.प.च्या नियमानुसार राजशिष्टाचाराचे पालन करावे. या अटींवर संबंधीत संस्थेला प्रदर्शन घेणेची मान्यता द्यावयाची आहे.

**श्री.फिरोज शेख,सदस्य:-** प्रदर्शनाचे व्यापारीकरण व्हावे हे आम्हालाही मान्य नाही.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) :-** आटपाडी येथे लोकसहभागातून कृषि प्रदर्शन घेणेस मान्यतेबाबत स्थायी समिती सभेने जि.प.सर्वसाधारण सभेस शिफारस करणेबाबतचा विषय सभेमध्ये ठेवणेत आलेला आहे.

**<u>बांधकाम विभाग</u>**

**कार्यकारी अभियंता (इवद) :-** यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन तिर्थक्षेत्र विकास,अंगणवाडी बांधकाम, स्वीय निधीमधील योजनांचा आढावा सादर केला. तसेच मागील सभेमध्ये चर्चा झालेप्रमाणे ३५ हेडच्या कामांची सद्यस्थितीची माहिती घेणेसाठी सॉफटवेअर तयार करणेत आलेले असून त्यांचे सादरीकरण करणेत आले.

**श्री.रणधीर नाईक,सदस्य :-** जिल्हा परिषद बांधकाम विभागाने हा एक चांगला उपक्रम राबविणेचे निश्चित केलेले आहे. यांचे प्रसार व प्रसिध्दी करणेसाठी एक कार्यक्रम आयोजित करुन त्यांचे लॉचिंग करणेत यावे. यामुळे सर्वांना कामांची सद्यस्थिती कधीही पाहता येणार आहे. व कार्यकारी अभियंता यांचे अभिनंदन करणेत यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** या सॉफटवेअर लॉचिंगसाठी कार्यक्रमाचे आयोजन करणेत यावे. प्रसिध्दी देणेत यावी.

**कार्यकारी अभियंता (इवद) :-** जिल्हा परिषद मुख्यालयातील लिफटचा व सी.सी.टी.व्ही कॅमेराचा प्रोग्राम तयार करणेत आलेला आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी :-** जिल्हा नियोजन समितीकडून निधी वर्ग करणेच्या सूचना दिलेल्या आहेत.

**श्री.रणधीर नाईक,सदस्य :-** एस.आर.ची बिले पेंडीग आहेत.

**कार्यकारी अभियंता (इवद) :-** ग्रामविकास विभागाकडून निधी प्रमाणात येतो त्यामुळे ही बिले प्रलंबित आहेत. रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात निधी येतो.

**श्री.रणधीर नाईक,सदस्य :-** यामध्ये जुनी बिले प्राधान्याने देणेत यावीत.

**श्री.गजानन कोठावळे,सभापती बांधकाम व आरोग्य समिती:-** उमदी पशुवैद्यकीय दवाखानी काम चालू झाले का?

**कार्यकारी अभियंता (इवद) :-** उमदी चे काम सुरु करणेत आलेले आहे लवकरच पूर्ण करुन घेत आहे.

**प्राथमिक शिक्षण विभाग**

**शिक्षणाधिकारी (प्राथ.) :-** यांनी आपल्या विभागाकडील आढावा सादर केला यामध्ये मुख्यत्वे करुन वृक्षारोपन संदर्भातील शासन निर्णयाचे वाचन करणेत आले. तसेच पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परिक्षा २०१५ मध्ये इ. ४ थी मध्ये २८३९७ विद्यार्थी बसलेले असून १६२८२ विद्यार्थी पास झालेले आहेत. शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी संख्या ४३६ असून राज्य गुणवत्ता यादीमध्ये ११ विद्यार्थी बसलेले आहेत. तसेच इ. ७ वी मध्ये २१०४६ विद्यार्थी बसलेले असून ७८०८ विद्यार्थी पास झालेले आहेत. शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी संख्या ४३५ असून राज्य गुणवत्ता यादीमध्ये १७ विद्यार्थी बसलेले आहेत. राज्य गुणवत्ता यादीमध्ये जि.प.शाळा धनगांव येथील चि.अलोक आनंदा उथळे व जि.प.मुलींची शाळा नं. ३ क.महांकाळ येथील संपकाळ सायली शितल यांचा समावेश आहे. यानंतर स्वीय निधीमधील शालेय विविध स्पर्धा, शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धा परिपत्रक छपाईचे कामकाज चालू आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार बाबत प्रस्ताव मागणी साठी पत्र देणेत आलेले आहे. स्कूल ऑन व्हीलसाठी तसलमात मागणीबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसचे या वर्षी इ. ४ थी व ७ वी साठी होणारी शिष्यवृत्ती परिक्षा शासनाने रद्द करुन इ. ५ वी व ८ वी साठी सुरु करणेचा निर्णय घेणेत आलेला आहे. यासाठी शिष्यवृत्ती परिक्षेच्या धर्तीवर जि.प.शाळेतील इ. ४ थी व ७ वी साठी जिल्हास्तरीय स्कॉलरशिप परिक्षा घेणेसाठी स्वीय निधीमधून तरतूद करणेबाबतचा ठराव शिक्षण समितीमध्ये घेणेत आलेला आहे. ७ जानेवारीच्या शासन निर्णयानुसार सन २०१४-१५ मध्ये अ श्रेणी-२८१, ब श्रेणी-११३७, क श्रेणी २९२ शाळा असल्यांचे सांगितले. सर्व शाळांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करणेत आलेले आहे.

**श्री.गजानन कोठावळे,सभापती बांधकाम व आरोग्य समिती:-** शाळामध्ये विद्यार्थी रक्तगटांची तपासणी करणेच्या सूचना देणेत आलेल्या आहेत काय?

**शिक्षणाधिकारी (प्राथ.) :-** राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळेची त्या शाळेमध्ये कार्यरत मान्यताप्राप्त शिक्षकांची, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची या शाळामध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती ऑनलाईन भरण्यासाठी राष्ट्रीय सूचना-विज्ञान केंद्र पुणे यांच्या माध्यमातून सरल या संगणक प्रणालीव्दारे माहिती ऑन लाईन घेणेत येणार आहे.त्या करीता जिल्हास्तरावरती व तालुकास्तरावरती संगणक प्रणालीव्दारे माहिती भरण्याची कार्यशाळा झाली असून सद्यस्थिती मध्ये शाळा व विद्यार्थी यांची माहिती भरण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे तसेच यामध्ये विद्यार्थी रक्तगट नोंदविणेचा